98.

भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९

**(१९८९ चा अधिनियम क्रमांक ३३)**

[ २९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान ]

# The Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989

**(Act No. 33 of 1989)**

[*As in force on the 29th May 1992*]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
(१९९२)
[किंमत रु. २.२०]

# अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९

कलमांचा क्रम


प्रकरण एक

प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

२. व्याख्या

प्रकरण दोन

अत्याचारांचे अपराध

३. अत्याचाराच्या अपराधांसाठी शिक्षा

४. कर्तव्यातील हयगयीबद्दल शिक्षा

५. नंतरच्या दोषसिद्धीबद्दल वाढीव शिक्षा

६. भारतीय दंड संहितेच्या विविक्षित उपबंधांची प्रयुक्ती

७. विवक्षित व्यक्तीच्या मालमत्तेचे समपहरण

८. अपराधासंबंधातील गृहीतक

९. शक्ती प्रदान करणे

प्रकरण तीन

तडीपारी

१०. अपराध करण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना दूर करणे.

११. व्यक्तीने क्षेत्रातून निघून जाण्यात कसूर केल्यास आणि काढून लावल्यावर त्या क्षेत्रात पुन्हा प्रवेश केल्यास कार्यपद्धती.

१२. कलम १० अन्वये ज्यांच्याविरुद्ध आदेश देण्यात आला आहे त्या व्यक्तीची मापे आणि छायाचित्रे इत्यादी घेणे.

१३. कलम १० खालील आदेशांचे पालन न करण्याबद्दल शास्ती

प्रकरण चार

विशेष न्यायालये

१४. विशेष न्यायालय

१५. विशेष सरकारी अभियोक्ता

प्रकरण पाच

संकीर्ण

१६. राज्य शासनाची सामूहिक द्रव्यदंड लादण्याची शक्ती

१७. कायदा व सुव्यवस्था यंत्रणेद्वारे केली जावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही

१८. या अधिनियमाखालील अपराध करणाऱ्या व्यक्तींना संहितेचे कलम ४३८ लागू न होणे

१९. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी व्यक्तींना संहितेचे कलम ३६० किंवा अपराधी परिवीक्षा अधिनियमाचे उपबंध लागू न होणे.

२०. अधिनियम इतर कायदयांवर अधिभावी असणे

२१. अधिनियमाची परिणामक अंमलबजावणी सुनिश्चित करून घेणे हे शासनाचे कर्तव्य.

२२. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीला संरक्षण

२३. नियम करण्याची शक्ती

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान असलेला अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध ) अधिनियम, १९८९ याचा मराठीतील प्राधिक्कृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक ३, दिनांक २ जुलै १९९२ यात पृष्ठ १६३ ते १६९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिक्कृत मराठी पाठ, प्राधिक्कृत पाठ ( केंद्रीय विधि ) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिक्कृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली
दिनांक : २ जुलै १९९२.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of The Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 as on the 29th May 1992 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, Section 1, No. 3, Vol. 3, dated 2nd July 1992 on pages 163 to 169,

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI
Dated : 2nd July 1992,

K. L. MOHANPURIA,
Secretary to the Government of India.

# अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९

(सन १९८९ चा अधिनियम क्र. ३३)

[११ सप्टेंबर १९८९]

(२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान)

अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जनजातीच्या व्यक्तींवर केल्या जाणाऱ्या अत्याचारांच्या अपराधांस प्रतिबंध करण्यासाठी, अशा अपराधांच्या संपरीक्षेसाठी विशेष न्यायालयांची तरतूद करण्यासाठी आणि अशा अपराधांना बळी पडलेल्यांना दाद देणे व त्यांचे पुनर्वसन करणे यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित वा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

भारतीय प्रजासत्ताकाच्या चाळिसाव्या वर्षी संसदेकडून खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, **व्याख्या.**

(क) "अत्याचार" याचा अर्थ, कलम ३ खालील शिक्षापात्र अपराध असा आहे ;

(ख) "संहिता" याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) असा आहे;

(ग) "अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती" या संज्ञांना, संविधानाच्या अनुच्छेद ३६६ च्या अनुक्रमे खंड (२४) व खंड (२५) मध्ये नेमून देण्यात आलेलेच अर्थ असतील ;

(घ) "विशेष न्यायालय" याचा अर्थ, कलम १४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले एखादे सत्र न्यायालय असा आहे ;

(ङ) "विशेष सरकारी अभियोक्ता" याचा अर्थ, विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आलेला एखादा सरकारी अभियोक्ता किंवा कलम १५ मध्ये निर्देशित केलेला एखादा अधिवक्ता, असा आ;

(च) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि संहितेत किंवा भारतीय दंड संहितेत (१८६० चा ४५) व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अनुक्रमे संहितेमध्ये, किंवा, प्रकरणपरत्वे, भारतीय दंड संहितेमध्ये नेमून देण्यात आलेलेच अर्थ असतील.

(२) कोणतीही अधिनियमिती किंवा तिचा कोणताही उपबंध अंमलात नसेल अशा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात या अधिनियमातील त्या अधिनियमितीच्या किंवा उपबंधाच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, त्या क्षेत्रात कोणताही तत्सम कायदा अंमलात असेल तर तो त्या कायद्याचा निर्देश आहे असा लावण्यात येईल.

प्रकरण दोन

## अत्याचारांचे अपराध

३. (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचा सदस्य नसलेला जो कोणी— **अत्याचाराच्या अपराधांसाठी शिक्षा.**

(एक) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या कोणत्याही सदस्यास, कोणताही अखाद्य किंवा घृणास्पद पदार्थ पिण्याची वा खाण्याची जबरदस्ती करील;

(दोन) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या कोणत्याही सदस्यांच्या जागेमध्ये किंवा तिच्या जवळपास विष्ठा, कचरा, मढी किंवा अन्य कोणताही घृणास्पद पदार्थ फेकून त्याला इजा करण्याच्या, त्याचा अपमान करण्याच्या वा त्याला त्रास देण्याच्या उद्देशाने कृती करील;

(तीन) अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अंगावरील वस्त्र फेडील किंवा तिची नग्नावस्थेत वा रंगवलेल्या चेहऱ्याने वा शरीराने धिंड काढील किंवा मानवाची प्रतिष्ठा न्यून करील अशी कोणतीही तत्सम कृती करील;

(चार) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या सदस्याच्या मालकीची किंवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने त्याला नेमून दिलेली किंवा नेमून दिली असल्याचे अधिसूचित केलेली कोणतीही जमीन अन्यायाने व्यापील किंवा लागवडीखाली आणील किंवा त्याला नेमून देण्यात आलेली जमीन हस्तांतरित करून घेईल;

(पाच) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याची जमीन वा जागा त्याच्याकडून अन्यायाने बळकावील किंवा कोणतीही जमीन, जागा वा पाणी यांवरील त्याच्या उपभोगाधिकारात हस्तक्षेप करील;

(सहा) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास "बिगारी" अथवा शासनाने सार्वजनिक प्रयोजनार्थ लादलेल्या कोणत्याही अनिवार्य सेवेव्यतिरिक्त इतर कोणत्याही तत्सम स्वरूपाचे सक्तीचे वा वेठबिगारी काम करण्यास भाग पाडील किंवा ते करण्यासाठी त्यास भुरळ पाडील;

(सात) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास त्याने एखाद्या विशिष्ट उमेदवाराला मत देऊ नये किंवा त्यालाच मत द्यावे अथवा कायद्याने उपबंधित केलेल्या रीतीव्यतिरिक्त अन्य रीतीने मतदान करावे यासाठी जबरदस्ती करील किंवा धाकदपटशा दाखवील;

(आठ) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याविरुद्ध खोटा, द्वेषमूलक किंवा तापदायक दावा अथवा फौजदारी वा अन्य वैध कार्यवाही दाखल करील;

(नऊ) कोणत्याही लोकसेवकाला कोणतीही खोटी वा क्षुद्र माहिती पुरवील आणि त्याद्वारे त्या लोकसेवकाकडून, अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याला इजा पोहोचेल किंवा त्रास होईल अशा तऱ्हेने त्याच्या कायदेशीर शक्तींचा उपयोग केला जाण्याची व्यवस्था करील;

(दहा) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याचा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी चारचौघांदेखत पाणउतारा करण्याच्या उद्देशाने हेतुपूर्वक अवमान करील किंवा त्यास धाकदपटशा दाखवील;

(अकरा) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या कोणत्याही स्त्रीवर, तिची बेअब्रू करण्याच्या वा तिचा विनयभंग करण्याच्या हेतूने हल्ला करील किंवा बळाचा उपयोग करील;

(बारा) अनुसूचित जातीच्या वा अनसूचित जनजातीच्या एखाद्या स्त्रीवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असल्यामुळे ज्यासाठी ती एरवी तयार झाली नसती, असे तिचे लैंगिक शोषण करण्यासाठी त्या स्थितीचा वापर करील;

(तेरा) सर्वसाधारणत: अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या सदस्यांकडून वापरला जाणारा कोणताही झरा, जलाशय, किंवा अन्य कोणताही जलस्त्रोत यांमधील पाणी, ते सर्वसाधारणपणे ज्या प्रयोजनासाठी वापरले जात असेल त्या प्रयोजनासाठी कमी योग्य ठरेल अशा रीतीने दूषित किंवा खराब करील;

(चौदा) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याला, सार्वजनिक राबत्याच्या एखाद्या ठिकाणी जाण्यायेण्याचा रुढिप्राप्त अधिकार नाकारील अथवा जनतेतील किंवा तिच्या एखाद्या गटातील कोणत्याही सदस्यास ज्याचा उपयोग करण्याचा किंवा जेथे प्रवेश करण्याचा अधिकार आहे अशा एखाद्या सार्वजनिक राबत्याच्या ठिकाणाचा वापर करण्यास किंवा तेथे प्रवेश करण्यास अशा सदस्याला जेणेकरून प्रतिबंध होईल अशा रीतीने अडथळा आणील ;

(पंधरा) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्यास आपले घर, गाव किंवा अन्य निवासस्थान सोडून जाण्याची जबरदस्ती करील किंवा त्यास ते सोडावयास लावील ;

त्याला सहा महिन्यांहून कमी नाही इतकी परंतु जी पाच वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

(२) अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य नसलेला जो कोणी,—

(एक) ज्यामुळे अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा कोणताही सदस्य त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे देहान्तदंड असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरावा या हेतूने किंवा तो सिद्धदोष ठरण्याची शक्यता आहे हे माहीत असताना, खोटा पुरावा देईल किंवा तयार करील त्याला जन्मठेपेची व द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल; आणि अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा एखादा निरपराध सदस्य अशा खोट्या किंवा तयार केलेल्या खोट्या पुराव्यामुळे सिद्धदोष ठरविण्यात आला आणि त्याला फाशी देण्यात आली तर, ज्या व्यक्तीने असा खोटा पुरावा दिला किंवा तयार केला असेल तिला मृत्यूची शिक्षा देण्यात येईल;

(दोन) ज्यामुळे अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा कोणताही सदस्य देहान्तदंड नव्हे पण ज्यासाठी सात वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा दिली जाऊ शकते अशा एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरावा या हेतूने किंवा तो सिद्धदोष ठरण्याची शक्यता आहे हे माहीत असताना खोटा पुरावा देईल किंवा तयार करील त्याला सहा महिन्यांहून कमी नाही परंतु जी सात किंवा अधिक वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल ;

(तीन) अनुसूचित जातीच्या वा अनुसूचित जनजातीच्या एखाद्या सदस्याच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान करण्याच्या हेतूने किंवा त्यायोगे असे नुकसान होईल अशी शक्यता आहे, हे माहीत असताना, तिला आग लावून किंवा कोणत्याही स्फोटक पदार्थाद्वारे आगळीक करील त्यास सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही परंतु जी सात वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल;

(चार) अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा एखादा सदस्य सर्वसाधारणत: प्रार्थनास्थळ म्हणून वा मानवी वसतिस्थान म्हणून किंवा आपल्या मालमत्तेच्या अभिरक्षेचे ठिकाण म्हणून जिचा वापर करीत असेल अशा कोणत्याही इमारतीचे नुकसान करण्याच्या उद्देशाने वा तिचे नुकसान होण्याची शक्यता आहे हे माहीत असताना, आग लावून वा एखाद्या स्फोटक पदार्थाद्वारे आगळीक करील त्याला जन्मठेपेची व द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल;

(पाच) एखादी व्यक्ती अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य आहे या कारणावरून त्या व्यक्तीविरुद्ध किंवा एखादी मालमत्ता अशा एखाद्या सदस्याची आहे या कारणावरून त्या मालमत्तेविरुद्ध भारतीय दंड संहितेद्वारे (१८६० चा ४५) ज्यासाठी दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येते असा कोणताही अपराध करील त्याला जन्मठेपेची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल;

(सहा) या प्रकरणाखालील एखादा अपराध करण्यात आला आहे हे माहीत असताना किंवा तसे वाटण्यास कारण असताना, वैध शिक्षेपासून अपराध्याला वाचवण्याच्या हेतूने, तो अपराध केल्याचा कोणताही पुरावा नाहीसा करील अथवा त्या उद्देशाने, त्या अपराधासंबंधात जी खोटी आहे हे त्याला ठाऊक आहे किंवा ती खोटी आहे असे त्याला वाटते अशी कोणतीही माहिती देईल त्याला त्या अपराधासाठी उपबंधित केलेली शिक्षा देण्यात येईल; किंवा

(सात) लोकसेवक असताना, या कलमाखालील कोणताही अपराध करील त्याला एक वर्षाहून कमी नाही इतकी, परंतु त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेच्या मुदतीइतकी वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल.

**कर्तव्यातील हयगयीबद्दल शिक्षा.**

४. लोकसेवक असून अनुसूचित जातीचा वा अनुसूचित जनजातीचा सदस्य नसलेला जो कोणी, या अधिनियमान्वये पार पाडणे आवश्यक असलेली कर्तव्ये पार पाडण्यात जाणूनबुजून हयगय करील त्याला सहा महिन्यांपेक्षा कमी नाही इतकी, परंतु जी एक वर्षापर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल.

**नंतरच्या दोषसिद्धीबद्दल वाढीव शिक्षा.**

५. जो कोणी, या प्रकरणाखालील एखाद्या अपराधाबद्दल पूर्वीच सिद्धदोष ठरलेला असताना, दुसऱ्या अपराधाबद्दल किंवा दुसऱ्या अपराधानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरला असेल त्याला एक वर्षाहून कमी नाही इतकी परंतु जी त्या अपराधासाठी उपबंधित शिक्षेच्या मुदतीइतकी वाढवता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल.

**भारतीय दंड संहितेच्या विवक्षित उपबंधांची प्रयुक्ती.**

६. या अधिनियमाच्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३४, प्रकरण तीन, प्रकरण चार, प्रकरण पाच, प्रकरण पाच क, कलम १४९ व प्रकरण तेवीसचे उपबंध, होईल तेथवर, ते भारतीय दंड संहितेच्या प्रयोजनांसाठी जसे लागू होतात तसे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी लागू होतील.

**विवक्षित व्यक्तीच्या मालमत्तेचे समपहरण.**

७. (१) या प्रकरणाअन्वये दंडनीय अशा कोणत्याही अपराधाबद्दल जेव्हा एखादी व्यक्ती सिद्धदोष ठरली असेल तेव्हा, विशेष न्यायालयाला, ठोठावण्यात येणाऱ्या शिक्षेबरोबरच, लेखी आदेशाद्वारे, घोषित करता येईल की, अशा व्यक्तीच्या मालकीची, जंगम वा स्थावर अथवा दोन्ही प्रकारची, जी कोणतीही मालमत्ता असा अपराध करण्यासाठी वापरण्यात आली असेल ती शासनाकडे समपहृत होईल.

(२) या प्रकरणाखालील कोणत्याही अपराधाचा आरोप एखाद्या व्यक्तीवर ठेवण्यात आला असेल तेव्हा, तिची संपरीक्षा करणाऱ्या विशेष न्यायालयाला असा आदेश देण्याची मुभा असेल की, तिच्या मालकीची जंगम वा स्थावर वा दोन्ही प्रकारची सर्व वा कोणतीही मालमत्ता अशा संपरीक्षेच्या कालावधीत जप्त करण्यात येईल आणि जेव्हा अशी संपरीक्षा दोषसिद्धीत परिणत होईल, तेव्हा अशा तऱ्हेने जप्त करण्यात आलेली मालमत्ता या प्रकरणान्वये ठोठावण्यात आलेल्या कोणत्याही द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत समपहृत केली जाण्यास पात्र असेल.

**अपराधासंबंधातील गृहीतक.**

८. या प्रकरणाखालील अपराधांसंबंधातील खटल्यामध्ये जर असे सिद्ध करण्यात आले असेल की,—

(क) या प्रकरणाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा केला असल्याचा वाजवी-रीत्या संशय असलेल्या एखाद्या व्यक्तीला, आरोपीने कोणतेही आर्थिक सहाय्य दिले आहे तर, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर अशा व्यक्तीने त्या अपराधाला अपप्रेरणा दिली असे विशेष न्यायालय गृहीत धरील;

(ख) या प्रकरणाखालील अपराध, व्यक्तींच्या एखाद्या गटाने केला असेल आणि असे सिद्ध करण्यात आले असेल की, करण्यात आलेला अपराध हा, जमिनीसंबंधातील वा अन्य कोणत्याही

बाबींसंबंधातील एखाद्या विद्यमान विवादाच्या परिणामी आहे तर, असे गृहीत धरण्यात येईल की, अपराध समाईक उद्देशाच्या पुरःसरणार्थ किंवा समाईक लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने करण्यात आला आहे.

**शक्ती प्रदान करणे.** ९. (१) संहितेमध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात—

(क) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्याचा मुकाबला करण्यासाठी; किंवा

(ख) या अधिनियमाखालील कोणत्याही प्रकरणासाठी किंवा प्रकरणांचा वर्ग वा गट यांसाठी, राज्य शासन, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला, तसे करणे राज्य शासनास योग्य वा समयोचित वाटेल तर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या संहितेअन्वये अशा जिल्ह्यातील किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या भागातील एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडून अशा प्रकरणासाठी, किंवा प्रकरणांचा वर्ग वा गट यांसाठी वापरता येण्याजोग्या असतील अशा शक्ती, आणि विशेषतः व्यक्तींना अटक करण्याच्या, त्यांच्या अन्वेषणांच्या वा कोणत्याही विशेष न्यायालयापुढे त्यांच्यावर खटला चालविण्याच्या शक्ती, प्रदान करू शकेल.

(२) सर्व पोलीस अधिकारी आणि शासनाचे अधिकारी हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम, योजना किंवा आदेश यांच्या उपबंधांच्या अंमलबजावणीसाठी पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला सहाय्य करतील.

(३) संहितेचे उपबंध, होईल तेथवर, पोटकलम (१) खालील अधिकाऱ्याने करावयाच्या शक्तींच्या वापरास लागू होतील.

## प्रकरण तीन

## **तडीपारी**

**अपराध करण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना दूर करणे.** १०. (१) संविधानाच्या अनुच्छेद २४४ मध्ये निर्देशित "अनुसूचित क्षेत्रे" किंवा "जनजाती क्षेत्रे" यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही क्षेत्रात एखादी व्यक्ती या अधिनियमाच्या प्रकरण दोन खालील एखादा गुन्हा करावयाची शक्यता आहे याबाबत एखाद्या फिर्यादीवरून किंवा पोलीस अहवालावरून विशेष न्यायालयाचे समाधान झाले असेल तर, ते, लेखी आदेशाद्वारे त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राच्या सीमेपलीकडे, अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत निघून जावे आणि तिला ज्या क्षेत्रातून निघून जाण्यास निदेशित करण्यात आले असेल तेथे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दोन वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीच्या आत तिने परत येऊ नये, असे निदेशित करू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील आदेशाबरोबर विशेष न्यायालय त्या पोटकलमान्वये निदेशित करण्यात आलेल्या व्यक्तीला, असा आदेश ज्या कारणांवरून देण्यात आला असेल ती कारणे कळवील.

(३) पोटकलम (१) खालील आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यात आला असेल तिच्याकडून अथवा तिच्यावतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून अशा आदेशाविरुद्ध अभिवेदन करण्यात आल्यानंतर लेखी अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी विशेष न्यायालयाला असा आदेश प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

**व्यक्तीने क्षेत्रातून निघून जाण्यात कसूर केल्यास आणि काढून लावल्यावर त्या क्षेत्रात पुन्हा प्रवेश केल्यास कार्यपद्धती.** ११. (१) ज्या व्यक्तीला कलम १० अन्वये कोणत्याही क्षेत्रातून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला आहे त्या व्यक्तीने जर विशेष न्यायालयाने पोटकलम (२) अन्वये दिलेल्या लेखी परवानगीने असेल त्याखेरीज अन्यथा :—

(क) निदेशित केल्याप्रमाणे निघून जाण्यात कसूर केली तर; किंवा

(ख) अशा प्रकारे त्या क्षेत्रातून निघून गेल्यानंतर त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अशा क्षेत्रात पुन्हा प्रवेश केला तर;

विशेष न्यायालय त्या व्यक्तीला अटक करवण्याची आणि विशेष न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्राबाहेरील अशा ठिकाणी पोलीस अभिरक्षेमध्ये तिला हलवण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) जिच्या संबंधात कलम १० अन्वये आदेश देण्यात आलेला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला विशेष न्यायालय लेखी आदेशाद्वारे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा तात्पुरत्या कालावधीसाठी आणि अशा शर्तींच्या अधीनतेने, तिला जेथून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल त्या क्षेत्रात परतण्याची परवानगी देऊ शकेल आणि लादण्यात आलेल्या शर्तींच्या यथोचित पालनासाठी, जामीनदारासह किंवा जामीनदाराविना एक बंधपत्र करून देण्यास फर्मावू शकेल.

(३) विशेष न्यायालयाला, अशी कोणतीही परवानगी कोणत्याही वेळी प्रत्याहृत करता येईल.

(४) जिला एखाद्या क्षेत्रातून निघून जाण्यास निदेशित करण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, जेव्हा अशा परवानगीनुसार त्या क्षेत्रात परत येईल तेव्हा ती लादण्यात आलेल्या शर्तींचे पालन करील आणि तिला ज्या तात्पुरत्या कालावधीसाठी परत येण्याची परवानगी देण्यात आली असेल तो कालावधी

संपल्यानंतर किंवा असा तात्पुरता कालावधी संपण्यापूर्वी अशी परवानगी प्रत्याहृत करण्यात आल्यावर, अशा क्षेत्राबाहेर निघून जाईल आणि पुन्हा परवानगी घेतल्याखेरीज कलम १० अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीतील न संपलेल्या भागात तेथे परत येणार नाही.

(५) एखाद्या व्यक्तीने तिच्यावर लादलेल्या अटींचे पालन करण्यात वा त्यानुसार अशा प्रकारे निघून जाण्यात कसूर केली किंवा अशा प्रकारे एखाद्या क्षेत्रातून निघून गेल्यानंतर पुन्हा परवानगी घेतल्याखेरीज अशा क्षेत्रात प्रवेश केला वा ती तेथे परत आली तर, विशेष न्यायालय तिला अटक करवण्याची आणि विशेष न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्राबाहेरील अशा ठिकाणी पोलीस अभिरक्षेमध्ये तिला हलवण्याची व्यवस्था करू शकेल.

कलम १० अन्वये ज्यांच्याविरुद्ध आदेश देण्यात आला आहे त्या व्यक्तींची मापे आणि छायाचित्रे, इत्यादी, घेणे.

१२. (१) जिच्याविरुद्ध कलम १० अन्वये एखादा आदेश देण्यात आला आहे अशी प्रत्येक व्यक्ती, विशेष न्यायालय तसे फर्मावील तेव्हा, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याद्वारे स्वतःची मापे व छायाचित्रे घेऊ देईल.

(२) जर पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेली कोणतीही व्यक्ती, अशी मापे किंवा छायाचित्रे घेऊ देण्यास प्रतिकार करील किंवा नाकारील, तर, ती घेतली जाणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व मार्गांचा वापर करणे कायदेशीर ठरेल.

(३) पोटकलम (२) अन्वये मापे वा छायाचित्रे घेऊ देण्यास प्रतिकार करणे किंवा नाकारणे हा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १८६ खालील अपराध असल्याचे मानण्यात येईल.

(४) ज्यावेळी कलम १० खालील एखादा आदेश प्रत्याहृत करण्यात येईल तेव्हा पोटकलम (२) अन्वये घेण्यात आलेली सर्व मापे आणि छायाचित्रे (व्यस्तचित्रांसह/निगेटिव्हज्‌सह) नष्ट केली जातील किंवा जिच्याविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या स्वाधीन केली जातील.

कलम १० खालील आदेशांचे पालन न करण्याबद्दल शास्ती.

१३. विशेष न्यायालयाने कलम १० खाली दिलेल्या एखाद्या आदेशाचे व्यतिक्रमण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

## प्रकरण चार

## विशेष न्यायालये

विशेष न्यायालय.

१४. त्वरित संपरीक्षेची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखालील अपराधांच्या संपरीक्षेसाठी, प्रत्येक जिल्ह्यासाठी, सत्र न्यायालय हे विशेष न्यायालय असल्याचे विनिर्दिष्ट करील.

विशेष सरकारी अभियोक्ता.

१५. प्रत्येक विशेष न्यायालयासाठी, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या न्यायालयात प्रकरणे चालवण्यासाठी एखादा सरकारी अभियोक्ता विनिर्दिष्ट करील किंवा कमीत कमी सात वर्षे इतका कालावधी अधिवक्ता म्हणून व्यवसाय करणाऱ्या एखाद्या अधिवक्त्याची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

सामूहिक द्रव्यदंड लादण्याची शक्ती.

१६. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ (१९५५ चा २२) याच्या कलम १० क चे उपबंध, राज्य शासनाची होईल तेथवर, या अधिनियमाखालील सामूहिक द्रव्यदंड लादण्याच्या व वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ आणि त्याच्याशी संबंधित सर्व बाबींसाठी लागू होतील.

कायदा व सुव्यवस्था यंत्रणेद्वारे केली जावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही.

१७. (१) एखाद्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा एखाद्या उपविभागीय दंडाधिकाऱ्याला किंवा अन्य कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याला किंवा एखाद्या पोलीस उप-अधीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला खबर मिळाल्यानंतर व त्याला आवश्यक वाटेल अशा चौकशीनंतर जर त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहणारी किंवा तेथे वारंवार येणारी अनुसूचित जातीची वा अनुसूचित जनजातीची नसणारी एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, या अधिनियमाखालील एखादा अपराध करण्याची शक्यता आहे वा करण्याची धमकी दिली आहे असे मानण्यास कारण असेल तर, आणि कार्यवाही सुरू करण्यास पुरेसे कारण आहे असे त्याला वाटत असेल तर, त्यास असे क्षेत्र हे अत्याचारप्रवण क्षेत्र असल्याचे घोषित करता येईल आणि शांतता व सद्वर्तन ठेवले जावे यासाठी व सार्वजनिक सुव्यवस्था व शांतता कायम राखण्यासाठी आवश्यक कार्यवाही करता येईल आणि प्रतिबंधात्मक कार्यवाही करता येईल.

(२) संहितेची प्रकरणे आठ, दहा व अकरा यांचे उपबंध, पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, होईल तेथवर, लागू होतील.

(३) राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एक किंवा अधिक योजना करता येतील व त्यांमध्ये, अत्याचारांस प्रतिबंध करण्यासाठी आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्या सदस्यांमध्ये सुरक्षिततेची भावना पुन्हा निर्माण करण्यासाठी पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले अधिकारी, अशा योजनेमध्ये वा योजनांमध्ये विनिर्दिष्ट केलेली समुचित कार्यवाही ज्या रीतीने करतील ती रीत विनिर्दिष्ट केलेली असेल.

या अधिनियमाखालील अपराध करणाऱ्या व्यक्तींना संहितेचे कलम ४३८ लागू न होणे.

१८. या अधिनियमाखालील अपराध केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तींचा अंतर्भाव होणाऱ्या कोणत्याही प्रकरणासंबंधात संहितेच्या कलम ४३८ मधील काहीही लागू होणार नाही.

या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी व्यक्तींना संहितेचे कलम ३६० किंवा अपराधी परिवीक्षा अधिनियमाचे उपबंध लागू न होणे.

१९. या अधिनियमाखालील अपराध केल्यामुळे दोषी असल्याचे आढळून आलेल्या अठरा वर्षांवरील वयाच्या कोणत्याही व्यक्तीला, संहितेच्या कलम ३६० चे उपबंध आणि अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) याचे उपबंध, लागू होणार नाहीत.

अधिनियम इतर कायद्यांवर अधिभावी असणे.

२०. या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, या अधिनियमाचे उपबंध, त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही रूढीमध्ये किंवा परिपाठामध्ये किंवा अशा कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये तद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, परिणामक होतील.

अधिनियमाची परिणामक अंमलबजावणी सुनिश्चित करून घेणे हे शासनाचे कर्तव्य.

२१. (१) केंद्र शासन, या संबंधात करील अशा नियमांच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या परिणामक अंमलबजावणीसाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना राज्य शासन करील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी उपबंधांच्या व्यापकतेला बाध न येता, अशा उपाययोजनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असू शकेल:—

(एक) अत्याचार ज्यांच्यावर झाले असतील त्या व्यक्तींना न्याय मिळवता यावा म्हणून त्यांना कायदेविषयक सहाय्य धरून पुरेशा सुविधा पुरवणे;

(दोन) या अधिनियमाखालील अपराधांचे अन्वेषण व संपरीक्षा चालू असताना, अत्याचारांना बळी पडलेल्यांसह त्यांच्या साक्षीदारांच्या प्रवास व निर्वाह खर्चासाठी तरतूद करणे;

(तीन) अत्याचारांना बळी पडलेल्या व्यक्तींच्या आर्थिक व सामाजिक पुनर्वसनासाठी तरतूद करणे;

(चार) या अधिनियमाच्या उपबंधांच्या व्यतिक्रमणाबद्दल खटले दाखल करण्यासाठी किंवा त्यांच्या पर्यवेक्षणासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे;

(पाच) अशा उपाययोजना किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याच्या कामी, राज्य शासनाला सहाय्य करण्यासाठी त्या शासनाला उचित वाटतील अशा पातळ्यांवर समित्यांची स्थापना करणे;

(सहा) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी अधिक चांगल्या प्रकारे व्हावी म्हणून उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने या अधिनियमाच्या उपबंधांच्या कामकाजाच्या नियतकालिक सर्वेक्षणासाठी तरतूद करणे;

(सात) अनुसूचित जातीचे व अनुसूचित जनजातीचे सदस्य यांच्यावर जेथे अत्याचार होण्याची शक्यता असेल अशी क्षेत्रे नक्की करणे, आणि अशा सदस्यांच्या सुरक्षिततेची ज्यायोगे सुनिश्चितता होईल अशा उपाययोजनांचा अवलंब करणे.

(३) राज्य शासनाने पोटकलम (१) अन्वये केलेल्या उपाययोजनांशी समन्वय साधण्यासाठी आवश्यक असतील असे उपाय, केंद्र शासन योजील.

(४) केंद्र शासन, दर वर्षी, या कलमाच्या उपबंधांनुसार त्याने स्वतःने व राज्य शासनांनी केलेल्या उपाययोजनांविषयीचा एक अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीला संरक्षण.

२२. या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक केलेल्या वा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल केंद्र शासन वा राज्य शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी वा प्राधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला वा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

२३. (१) केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल. आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपांतच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई